# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.08.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- अनेक दशकांपासून इतर देशांपासून अंतर राखण्याचं धोरण बदलून जगातल्या सगळ्या देशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचं भारताचं नवं धोरण असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- करदात्यांना पाठवलेल्या नोटिसची भाषा अधिक सोपी बनवण्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं प्राप्तीकर विभागाला आवाहन
- ग्राहकोपयोगी गतिमान वस्तूंच्या क्षेत्रात आशिया-प्रशांत प्रदेशात भारत आघाडीवर
- महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचे पीक विम्यासंबंधी प्रश्न सोडविण्याची केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची ग्वाही

आणि

- जॉर्डनमध्ये 17 वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत भारतीय कुस्तीपटू रोनक दहिया कास्यपदकाचा मानकरी.

**पंतप्रधान**

पोलंडच्या दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी आज वॉर्सा इथं पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्याशी द्विपक्षीय संबंधांबाबत चर्चा करतील तसंच पोलंडचे राष्ट्राध्यक्ष आंद्रेज डुडा यांचीही भेट ते घेणार आहेत. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी उद्योजक आणि भारतीय समुदायाशीही संवाद साधणार आहेत. या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर समाजमाध्यमावर व्यक्त होताना पंतप्रधान मोदी यांनी सांगितलं की, अनेक दशकांपासून भारताचं इतर देशांपासून अंतर राखण्याचं धोरण होतं मात्र आता या धोरणात बदल झाला असून जगातल्या सगळ्या देशांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचं धोरण आता भारतानं स्वीकारलं असल्याचं ते म्हणाले. तसंच हे युद्धाचे युग नसून संघर्ष सोडवण्यासाठी भारत नेहमीच संवाद आणि मुत्सद्देगिरीवर विश्वास ठेवत आला आहे. याशिवाय शांततेचा पुरस्कार करणाऱ्या भारताला आता संपूर्ण जग विश्वबंधू मानत असल्याचं मोदी यांनी अधोरेखित केलं. या दौऱ्यामुळे भारत-पोलंड मैत्रीला गती मिळेल असंही मोदींनी समाजमध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. गेल्या 45 वर्षांत भारतांच्या पंतप्रधानांचा पोलंडचा हा पहिलाच दौरा आहे.

दरम्यान, पंतप्रधान मोदी उद्या युक्रेनच्या दौऱ्यावर जाणार असून ते युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमिर झेलेन्स्की यांची भेट घेऊन द्विपक्षीय संबंधांसह विविध मुद्यांवर चर्चा करतील. या दौऱ्यात ते विद्यार्थ्यांसह भारतीय समुदायाशीही संवाद साधतील. पंतप्रधानांच्या युक्रेनच्या दौऱ्यामुळे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ होण्यास मदत होईल.

**कर-भिती**

करदात्यांच्या मनात भीतीची भावना निर्माण होऊ नये म्हणून करदात्यांना पाठवलेल्या नोटिसची भाषा अधिक सोपी आणि सरळ बनवण्याचं तसंच नोटीस पाठवण्याच्या कारणाचं स्पष्टीकरण देखील देण्यात यावं, असं आवाहन अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्राप्तीकर विभागाला केलं आहे. त्या काल नवी दिल्लीत प्राप्तीकराच्या 165 व्या वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या.
72 टक्के करदात्यांनी जुन्या कर प्रणालीऐवजी नवीन कर प्रणालीचा स्वीकार केला असून करप्रणाली चेहराविरहित असल्यानं करदात्यांचा विश्वास संपादन केला आहे,असंही निर्मला सीतारामन यावेळी म्हणाल्या.

**खादी-करार**

खादी आणि ग्रामोद्योग आयोगानं टपाल विभागासोबतच्या एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. या करारानुसार आता टपाल विभागाचे कर्मचारी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत देशभरात स्थापन होत असलेल्या नवीन विभागांची प्रत्यक्ष पडताळणी करतील.त्यासाठी टपाल विभागातील कर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षणही देण्यात येईल. टपाल विभागाचे उपमहाव्यवस्थापक डॉ. अमनप्रीत सिंग आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजन बाबू यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

**राष्ट्रीय अंतरिक्ष दिन**

भारताच्या यशस्वी चांद्रयान मोहिमेनिमित्त पहिला राष्ट्रीय अंतरिक्ष दिन उद्या देशभरात साजरा केला जाणार आहे.यानिमित्त देशभरात एक हजाराहून अधिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे,असं अंतरिक्ष राज्यमंत्री डॉ जितेंद्र सिंह यांनी काल नवी दिल्लीत सांगितलं. यानिमित्त बंगळुरूमधल्या जवाहरलाल नेहरू तारांगणमध्येदेखील विशेष कार्यक्रमाचं नियोजन करण्यात आलं आहे,असं तारांगणचे संचालक आणि इस्त्रोचे माजी शास्त्रज्ञ डॉ बीआर गुरुप्रसाद यांनी सांगितलं.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**एफएमसीजी**

जलद गतीनं विक्री होणाऱ्या ग्राहकोपयोगी वस्तूंच्या क्षेत्रात भारत सातत्यानं दोन अंकी वाढीसह आशिया-प्रशांत प्रदेशात आघाडीवर आहे, असं नेल्सनआयक्यु या सर्वेक्षण संस्थेनं काल जारी केलेल्या अहवालात म्हटलं आहे. या अहवालानुसार शहरांमध्ये वास्तव्यास असलेले 41 टक्के भारतीय नागरिक उत्पादनांची माहिती ऑनलाइन पाहतात मात्र प्रत्यक्ष खरेदी ही दुकानातूनच करतात. सणासुदीच्या काळात विशेष सवलती असल्यानं तंत्रज्ञानाधारीत उत्पादनांच्या विक्रीत लक्षणीय वाढ होत असून चलनवाढ असूनही बाजारपेठेतली स्पर्धा वाढत आहे,असंही या अहवालात सांगण्यात आलं आहे.

**महाराष्ट्र शेतकरी**

महाराष्ट्रातील कांदा, कापूस आणि सोयाबीन उत्पादकांसह अन्य शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी विशेष बैठक बोलावण्यात येईल, तसंच महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना पीक विम्यासंबंधी असलेल्या समस्या सोडविण्यात येतील अशी ग्वाही केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी दिली आहे. ते काल बीड जिल्ह्यात आयोजित राज्यस्तरीय कृषी महोत्सवात बोलत होते. या कार्यक्रमात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्याची विनंती केंद्रीय कृषिमंत्र्यांना केली.शिवराजसिंह चौहान यांनी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत असताना केलेल्या लक्षणीय कामगिरीचा दाखला देत महाराष्ट्रातही अशाच प्रयत्नांची गरज असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितलं. महाराष्ट्राचे कृषीमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ठळकपणे सांगितले की, 10 लाख 70 हजार शेतकऱ्यांसाठी पीक विमा लागू करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य असून विम्याची रक्कम लवकरात लवकर देण्यात यावी अशी विनंती महाराष्ट्राचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केली तसंच ड्रोन तंत्रज्ञानामुळं शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊन पीक उत्पादनातही 20 टक्क्यांच्या वाढीचा फायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो, असंही धनंजय मुंडे यांनी सांगितलं.

**राष्ट्रपती**

तंत्रज्ञानाचा गैरवापर विनाशकारी ठरू शकतो म्हणून तंत्रज्ञानाचा वापर शाश्वत विकास आणि सार्वजनिक हितासाठी करायला हवा,असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या काल हरियाणातल्या फरीदाबाद इथं जे सी बोस विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्यापीठाच्या 5 व्या दीक्षांत सोहळ्यात बोलत होत्या.प्रगतीचे अनेक मार्ग सध्या उपलब्ध झाले असून तंत्रज्ञानाच्या विकासामुळं आणि दुर्गम भागात इंटरनेटच्या उपलब्धतेमुळं ऑनलाइन रोजगारांची संख्या निर्माण झाली आहे.असंही राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.या विद्यापीठानं अनेक औद्योगिक आणि शैक्षणिक संस्थांशी करार केल्याच्या उपक्रमाचं कौतुकही राष्ट्रपती मुर्मू यांनी केलं

**स्फोट**

आंध्र प्रदेशमध्ये, अनकापल्ली जिल्ह्यातील अच्युतापुरम सेझमधील औषध निर्माण कंपनीत अणुभट्टीच्या स्फोटात सात जण ठार आणि 30 हून अधिक लोक गंभीर जखमी झाले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे जिल्हा अधिकाऱ्यांनी सांगितले. मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी स्फोटात झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे. पीडितांना मदत करण्याचे निर्देश त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. मृतांच्या कुटुंबीयांना सरकार मदत करेल, अशी घोषणा त्यांनी केली.

**रोनक-कुस्ती-कास्य**

भारतीय कुस्तीपटू रोनक दहियाने काल जॉर्डनमध्ये झालेल्या 17 वर्षांखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत पुरुषांच्या ग्रीको-रोमन 110 किलोग्रॅम स्पर्धेत कास्यपदक जिंकलं. दहियाने पदकाच्या महत्त्वपूर्ण लढतीत तुर्कीचा कुस्तीपटू इमरुल्ला कॅपकानचा 6-1 असा पराभव केला. यासह भारतानं दोन कास्यपदकांसह पुरुषांच्या ग्रीको-रोमन गटातील आपली मोहीम पूर्ण केली. साईनाथ पारधीनेही 51 किलोग्रॅम प्रकारात कास्यपदक मिळवलं आहे.

**हॉकी-ओडिशा**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कास्य पदक जिंकणाऱ्या भारतीय पुरुष हॉकी संघाचं काल भुवनेश्वर विमानतळावर चाहत्यांनी आणि ओडिशा सरकारने भव्य स्वागत केलं. ओडिशाचे क्रीडा मंत्री सूर्यवंशी सूरज, प्रधान सचिव भास्कर ज्योती सरमा आणि इतर सरकारी अधिकारी हॉकी इंडियाचे अध्यक्ष डॉक्टर दिलीप कुमार तिर्की आणि खजिनदार सेकर जे मनोहरन देखील यात सहभागी झाले. दरम्यान, उत्कृष्ट बचावपटू ओडिशाचा अमित रोहिदास,  याला मुख्यमंत्री मोहन चरण माझी आणि उपमुख्यमंत्री कनक वर्धन सिंग देव यांच्याकडून चार कोटी रुपयांचा विशेष रोख पुरस्कार मिळाला. दुसरीकडे, "द वॉल" म्हणून ओळखला जाणारा भारताचा गोलरक्षक श्रीजेशला 50 लाख रुपयांचे रोख पारितोषिक मिळाले, इतर सर्व खेळाडूंना प्रत्येकी 15 लाख रुपये मिळाले. केरळ सरकारने गोलरक्ष पी आर श्रीजेश याला 2 कोटी रुपयांचं रोख बक्षीस देण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत काल हा निर्णय घेण्यात आला.

**हवामान-वेधशाळा**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने पुढील दोन दिवसांत आसाम, मेघालय आणि त्रिपुरामध्ये अति मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे. पुढील 24 तासांत केरळमध्ये मुसळधार ते अति मुसळधार आणि लक्षद्वीपमध्ये अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**